३६४१२०७७
१७८५१९५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८
कामगार कल्याण विभाग
क्रमांक - काक/३ /कावि/१०८ /२०१७
दिनांक -१६/०५/२०१७

**विषय** - भविष्य निर्वाह निधी कायदयाची पुर्तता करणेबाबत.

**संदर्भ** – १. परिपत्रक क्र. काक/३/कावि/१६९/२०१३ दिनांक १९/०३/२०१३
२. आदेश क्र. काक/३/कावि/४४४/२०१३ दिनांक १२/०८/२०१३
३. परिपत्रक क्र. काक/३/कावि/५६०/२०१३ दिनांक ३१/१०/२०१३
४. परिपत्रक क्र. काक/३/कावि/१८०/२०१४ दिनांक २४/०६/२०१४

**परिपत्रक,**

केंद्र शासनाच्या दिनांक ८.१.२०११ च्या नोटिफिकेशननुसार भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ ची अंमलबजावणी महानगरपालिकेस करणे अनिवार्य झालेले आहे. महानगरपालिकेने कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कामगारांचा तसेच महानगरपालिकेने नेमलेल्या कंत्राटदारांनी नियुक्त केलेल्या कामगारांचा भविष्य निर्वाह निधी नियमित (दरमहा) भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे भरणे कायदयाने आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या विविध विभागांतर्गत नेमलेल्या ठेकेदारांनी नियुक्त कामगारांचा भविष्य निर्वाह निधी भरल्याबाबतचे पुरावे सादर करण्याचे दायित्व मुख्य मालक (Principle Employer) म्हणून महानगरपालिकेचे आहे. यातील मुख्य तरतुदी म्हणून महानगरपालिकेच्या अधिन असणा-या सर्व कामगारांचा तसेच कंत्राटी कामगार, तात्पुरत्या स्वरुपाचे कामगार, बदली कामगार इत्यादी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे महानगरपालिकेसाठी काम करणारे अथवा महानगरपालिकेतर्फे लावण्यात आलेल्या सर्व कामगारांचा समावेश होत असल्याने भविष्य निर्वाह निधीची पुर्तता करणेसाठी संबधीत विभागांना संदर्भिय परिपत्रकान्वये वेळोवेळी कळविण्यात आले असतांनाही सदरची बाब गांभीर्याने घेतली गेलेली नाही. त्यामुळे भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने महानगरपालिकेस कलम 7A अंतर्गत समन्स पाठवून सुनावणी सुरु केलेली आहे. सुनावणीमध्ये महानगरपालिकेची कायदेशिर बाजू कामगार कल्याण विभागाकडून मांडण्यात येत असून संबधीत विभागाकडून माहिती मागवून संकलित करणे, माहितीचे एकत्रीकरण करुन भविष्य निर्वाह निधी कार्यालयास सोपविण्याचे दायित्व लेखा विभागाकडे सोपविण्यात आलेले आहे.

भविष्य निर्वाह निधी कायद्याच्या कलम 7A अंतर्गत चालू असलेल्या सुनावणीचे अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त तसेच मा. आयुक्त यांनी विभागप्रमुख व संबंधीत लेखाधिकारी यांच्या संयुक्त बैठकीमध्ये 7A च्या सुनावणीसाठी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन संबंधीत ठेकेदारांना देयके अदा करणेबाबत आदेश दिलेले होते. त्यानुसारच कार्यवाही करुन बील अदायगी करणे आवश्यक आहे. याकामी काही हयगय झाल्यास संबंधीत विभागप्रमुख यांना जबाबदार धरणेत येईल.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुखांना पुनश्च: कळविण्यात येते की, संबंधीत विभागांनी ठेकेदारांची देयके अदा करणेपूर्वी कामगार कल्याण विभागाकडील संदर्भिय क्र. १ ते ४ अन्वये दिलेल्या सूचनांचे पालन करावे. यामध्ये हलगर्जीपणा करणा-या संबंधीत अधिका-यांविरुध्द योग्य ती प्रशासकीय कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

**आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – ४११ ०१८

प्रति –

सर्व विभाग प्रमुख